राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

तक्रार क्रमांक-१८४/२०२६/नाशिक व्दितीय अपील क्र.- ६२७४/२०२४/ नाशिक		
अ.क्र.	तपशील	
१.	श्री. राजाराम धोंडीराम भवर,रा.मु.पालखेड (बं.), ता.दिंडोरी,जि.नाशिक	तक्रारदार
विरूद्ध		
१.	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,पालखेड (बंधारा), ता.दिंडोरी,जि.नाशिक	उत्तरवादी क्र.१
२.	विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, दिंडोरी, ता.दिंडोरी, जि. नाशिक	उत्तरवादी क्र.२

(निर्णय दिनांक ०३/०८/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक ०६/०३/२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६२७४/२०२४/नाशिक** संदर्भात दिनांक २६/०९/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १२/१२/२०२५ अन्वये आदेश पारीत केलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार **जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पालखेड (बंधारा), ता. दिंडोरी, जि.नाशिक** यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की, आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६२७४/२०२४/नाशिक** संदर्भात दिनांक २६/०९/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक १२/१२/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पालखेड (बंधारा), ता.दिंडोरी, जि.नाशिक** यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्रमांक **६२७४/२०२४/नाशिक** संदर्भात दिनांक १२/१२/२०२५ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. **उपमुख्य कार्यकारी अधिकारी- पंचायत विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक** यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१८४/२०२६/नाशिक** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

तक्रार क्रमांक-१८४/२०२६/नाशिक/जावक क्र.८४६४ दिनांक-१२/०८/२०२६

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक

२.उपमुख्य कार्यकारी अधिकारी-पंचायत विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक

३. निवडनस्ती.